# होमिओपॅथीबद्दलचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न : डॉ. विजयकर

महाबळेश्वर, दि. ३ : समाजात ोमिओपॅथीबद्दल असणारे समज व रसमज दूर करून डॉक्टरांमध्ये ात्मविश्वास वाढविणे व रुग्णाचा ाजार समूळ नष्ट करण्यासाठी ोमीओपॅथीचा प्रचार करणे, हाच या ेषयी आयोजित होणाऱ्या ार्यशाळांचा मुख्य उद्देश सल्याची माहिती डॉ. प्रफुल्ल ेजयकर यांनी वार्ताहरांना दिली.

अॅकेडमी फॉर चारिटीज, रिसर्च ॅन्ड एज्युकेशन आणि डॉ. प्रफुल्ल ेजयकर यांच्या स्कूल ऑफ प्रेडिक्टिव ामिओपॅथी यांच्या संयुक्त विद्यमाने थील हॉटेल गौतमच्या भव्य हॉलमध्ये ामिओपॅथी तज्ज्ञांची व डॉक्टरांची ात दिवसांची कार्यशाळा नुकतीच ुरू झाली. तिचा शुभारंभ या कूलचे प्रमुख डॉ. प्रफुल्ल विजयकर ांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. ावेळी डॉ. विजयकर यांच्या हस्ते ामिओपॅथीचे जनक डॉ. हानिमान ांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण रण्यात आला. यावेळी डॉ. प्रवीण न, डॉ. विजय शहा, डॉ. महेश भद्रा, ॉ. बंदिश अंबानी, डॉ. अनिता ाळुंखे, डॉ. सुचेता देसाई, डॉ. नरेंद्र हता, डॉ. प्रफुल्ल बोरकर आदी पस्थित होते.




होमिओपॅथीच्या कार्यशाळेचा शुभारंभ करताना डॉ. प्रफुल्ल विजयकर, डावीकडून डॉ. महेश भद्रा, डॉ. बोरकर, डॉ. अनिता साळुंखे, डॉ. सुचेता देसाई, डॉ. नरेंद्र मेहता, डॉ. विजय शहा, डॉ. बंदिश अंबानी, डॉ. प्रवीण जैन (छाया : संजय दस्तुरे, महाबळेश्वर.)

इक्टोडर्म, एन्डोडर्म, मिसोडर्म ऑफ कनेक्टिव्ह टिशू, मिसोडर्म ऑफ ऑर्गन, अॅपुड सिस्टिम, न्यूरल प्लेट आणि दि सेल (जेनेटिक कोड) या रोगांच्या सात पायऱ्या असून त्या आधारे आपण होमिओपॅथीच्या माध्यमातून रोग्याला काय होणार, या त्याला काय होत असेल, तसेच त्याच्यावर उपचार करताना एखाद्या विशिष्ट एका रोगावर इलाज न करता, त्यापूर्वीचा रोग समजावून घेऊन तो समूळच नष्ट करू शकतो, त्याचे भाकित करू शकतो, असा सिध्दांत संपूर्ण जगात होमिओपॅथीच्या माध्यमातून सिध्द करून दाखविला असून, त्यावर प्रेडिक्टिव्ह होमिओपॅथी नावाची दोन पुस्तके लिहिली गेली आहेत. ती संपूर्ण जगात प्रसिध्द झाली असून त्याचे भाषांतर जर्मनी, पोर्तुगाल व रशियन भाषेतही झालेले आहे, असे सांगून डॉ. प्रफुल्ल विजयकर म्हणाले, की होमिओपॅथी चिकित्सापध्दती अत्यंत शास्त्रशुध्द वैद्यकीय पध्दती असून त्याचा पुरेपूर उपयोग करून घेतल्यास कॅन्सर, एड्स तसेच अन्य असाध्य रोगही काबूत आणून रोग्याला उत्तम आयुष्य जगण्याची खात्री देता येते.

होमिओपॅथीमध्ये रोगावर तात्पुरता उपचार करून तो लगेच बरा करण्यापेक्षा रोग्याच्या शारीरिक, मानसिक बाबींचा अभ्यास करून रोग समूळ नष्ट केला जातो, असे सांगून या कार्यशाळेत त्याबद्दल सखोल मार्गदर्शन केले जाते, असेही डॉ. विजयकर यांनी सांगितले.

या कार्यशाळेस महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात, चंदीगढ आदी राज्यांतून सुमारे दोनशे होमिओपॅथी तज्ज्ञ, डॉक्टर्स, विविध होमिओपॅथी कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक सहभागी झाले असून जर्मनीतील प्रतिनिधी डॉ. गुंतर लुटझ व डॉ. इंगे स्टॅंडलर उपस्थित आहेत, अशी माहिती डॉ. नरेंद्र मेहता यांनी दिली.

## जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेसाठी जावली तालुक्यातील संघांची निवड

सातारा, दि. ३ : सावली, ता. जावली येथील क्रांती विद्यालयाच्या मैदानावर झालेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेतील सात शालेय संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

निवड झालेले शालेय संघ पुढील प्रमाणे : १४ वर्षे वयोगट : मुले- महाराजा शिवाजी हायस्कूल, कुडाळ, मुली- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, म्हाते खुर्द, १६ वर्षे वयोगट- मुले- महाराजा शिवाजी हायस्कूल, कुडाळ, मुली- नवमहाराष्ट्र विद्यालय, शिवनगर (रायगाव), १७ वर्षे वयोगट- मुले- क्रांती विद्यालय, सावली, मुली- अण्णासाहेब पाटील विद्यालय, म्हाते बुद्रुक, १९ वर्षे वयोगट- मुले- महाराजा शिवाजी हायस्कूल, कुडाळ. या स्पर्धेचे उद्घाटन पंचायत समितीच्या सदस्या सौ. धनश्री कारंजकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेचे संयोजन क्रीडा शिक्षक डी. वाय. पठारे, एस. एस. जाधव यांनी केले.

## विवाहिता बेपत्ता

सातारा, दि. ३ : आरळे (ता. सातारा) येथील सीमा पोपट फाळके ही २८ वर्षीय विवाहिता दि. २३ ऑगस्ट रोजी पोवईनाका परिसरातून बेपत्ता झाली आहे.